# मराठयांच्या स्वातंत्र्यसंग्रामातील धनाजी जाधवांची कामगिरी :-

प्रा. डॉ. निलीमा राऊत
डॉ. पंजाबराव देशमुख कला व
वाणिज्य महाविद्यालय, नागपूर

दक्षिण भारताच्या इतिहासामध्ये यदु उर्फ यादव उर्फ जाधव घराण्याचे योगदान अनन्यसाधारण आहे. एकेकाळी दक्षिणेत स्वतंत्र सत्ता उपभोगलेल्या देवगिरीच्या यादवांचेच पुढील वारस म्हणजे मराठयांच्या राज्याचे सरसेनापती धनाजी जाधव होते. क्षत्रिय परंपरा असलेल्या आणि क्षात्रतेज लाभलेल्या जाधवांच्या घरण्यात शंभूसिंग उर्फ संभाजी जाधवांच्या पोटी धनाजी जाधवांचा जन्म झाला.[१]

धनाजी जाधव हे यादव उर्फ जाधव घराण्यातील सर्वात तेजस्वी, कर्तबगार योध्दा होते. धनाजींनी आपल्या हयातीपर्यंत मराठी राज्याचा यज्ञकुंड प्रज्वलित ठेवण्यासाठी अखंड संघर्ष केला. १७ व्या शतकात महाराष्ट्राच्या मातीत ज्या कर्तबगार नररत्नांनी जन्म घेतला. त्यामध्ये धनाजी जाधवांचे कर्तृत्व खूप मोठे आहे. शहाजी राजे भोसले आणि शिवाजी राजे यांचे मार्गदर्शन धनाजी जाधवांना लाभले होते. म्हणून धनाजीच्या कार्यकर्तृत्वावर या विभुतींचा त्यांच्या वैचारीक आणि राजकीय जडणघडणीचा प्रभाव निश्चितच पडला. म्हणूनच छत्रपती शिवाजी, छत्रपती संभाजी छत्रपती राजाराम हे तीन छत्रपती आणि महाराणी ताराबाई यांच्या कार्यकाळात धनाजी जाधवांनी स्वकर्तुत्वाने अनेक वेळा महत्वपूर्ण व निर्णायक भूमिका पार पाडल्या. स्वराज्यासाठी धनाजीने प्रारंभापासूनच वाहून घेतले.[२]

## मराठयांच्या स्वातंत्र्यसंग्रामातील धनाजी जाधवांची कामगीरी :- १६८९-१७०७.

औरंगजेबाने ११ मार्च १६८९ रोजी संभाजीची अत्यंत हालहाल करुन हत्या केली.[३] मराठयांच्या छत्रपतीचा अशा पध्दतीने शेवट व्हावा ही अत्यंत शोचनीय बाब होती. परंतु धनाजी व संताजींनी मात्र यातून प्रेरणा घेऊन झालेल्या घटनेला सडेतोड प्रत्युत्तर देण्यासाठी पराक्रमाची शर्थ केली.

छत्रपती संभाजीच्या मृत्यूनंतर स्वराज्याची विस्कळीत घडी व्यवस्थित करण्यासाठी महाराणी येसुबाईंनी विलक्षण मनोधैर्य दाखविले. त्यांनी रायगडावर चांगोजी काटकर, येसाजी कंक, संताजी घोरपडे, धनाजी जाधव इत्यादि मुत्सद्यांना एकत्र करुन त्यांच्यात मसलत करुन राजाराम महाराजांना सिंहासनावर बसविले.[४] येसुबाईंनी मराठा सरदारांना स्वराज्याच्या रक्षणासाठी कटिबध्द राहण्याच्या सूचना केल्या. अशा परिस्थितीत धनाजी जाधवांसमोर अनेक आव्हाने होती. छत्रपती संभाजीच्या मृत्यूचा बदला, नवीन छत्रपतीचे

संरक्षण, फौजेची जमवाजमव, आर्थिक संकटाचा बंदोबस्त, इत्यादि अनेक समस्यांना तोंड देऊन स्वराज्य एकसंघ राखण्याचे मोठे आव्हान होते.

**मुकर्रबखानाचा बंदोबस्त** :-

छत्रपती संभाजी महाराजांस कैद करणारा शेख निझाम उर्फ मुकर्रबखान हा कोल्हापूरजवळ वास्तव्य करुन होता. याची खबर लागताच धनाजी जाधव आणि संताजी घोरपडे यांनी शेख निझामाचा पराभव करुन त्याचे हत्ती घोडे आणि ब-याच खजिन्याची लूट केली.[५] या स्वारीत शेख निझामाच्या सैन्याला पळता भुई थोडी केली. शेख निझाम कसाबसा जीव वाचविण्यात यशस्वी झाला. पुढे डिसेंबर १६८९ मध्ये कोकणामध्ये संगमेश्वर हे मोगलांचे लष्करी ठाणे जिंकून घेण्यात आले.

मोगल बादशहा औरंगजेबाच्या झंझावातामुळे अनेक मराठी सरदार मोगलांना जाऊन मिळाले होते. अशाच जावळीच्या बंडखोर मराठी सरदारांचे पारिपत्यही धनाजी जाधवांनी सप्टेंबर १६८९ रोजी केले.[६] संताजी घोरपडे व धनाजी जाधव यांनी सल्लामसलत करुन संताजीने कोरेगाव (तुळापूर) येथे असलेल्या औरंगजेब बादशहाच्या छावणीवर हल्ला करुन, बादशाही छावणीत घुसून बादशाही छावणीचे कळस कापून आणले. तर त्याच वेळी फलटण - बारामती भागात असणा-या रणमस्तखान व शहाबुद्दीनखान या खानांचा समाचार धनाजी जाधवांनी घेतला.[७]

मोगलांचे लक्ष रायगडावरुन विचलित करण्याकरिता किंवा रायगडला मोगलांनी दिलेला वेढा ढिला पडावा या हेतून धनाजी आणि संताजीने मोगलांच्या प्रदेशावर केलेले आक्रमण हे त्यांच्या लष्करी डावपेच व मुत्सद्देगिरीचे उत्कृष्ट उदाहरण होय.

यावेळी राजाराम महाराज खुश होऊन धनाजी जाधवांना मानाची वस्त्रे आणि “जयसिंगराव” हा किताब देऊन सन्मानित केले.[८] धनाजी आणि संताजीचे पराक्रम असामान्य होते. परंतु प्रचंड मोगली फैजैपुढे मराठयांच्या छत्रपतीचे रक्षण करणे दिवसेंदिवस अवघड होते. यावेळी औरंगजेबाने आदिलशाही आणि कुतुबशाही गिळंकृत केली होती. त्यामुळे मराठयांना कुठूनही मदतीची आशा नव्हती. अशा आणीबाणीच्या प्रसंगी कर्नाटकात जाऊन जिंजी येथे राजधानी स्थापण्याचा व तेथून शत्रूंशी संघर्ष चालू ठेवण्याचा निर्णय छत्रपती राजारामांनी घेतला. छत्रपती राजाराम महाराज आपले निवडक अधिकारी आणि सेनानी घेऊन पन्हाळयावरुन २६ सप्टेंबर १६८९ रोजी जिंजीकडे प्रयाण केले.[९] अशा परिस्थितीत महाराजांनी महाराष्ट्रातील स्वराज्याचे सर्व अधिकार रामचंद्र पंताकडे दिले होते. तर धनाजी जाधव आणि संताजी घोरपडे यांवर स्वराज्य रक्षणाची जबाबदारी सोपविली होती.[१०]

**सातारचा वेढा आणि सर्जाखानाच कैद** :- **२०-२५ एप्रिल १६९०.**

लष्करीदृष्टया महत्त्वाचा असलेल्या साता-याच्या किल्ल्याला सर्जाखानाने (सर्नाखानाने) सन १६९० मध्ये वेढा दिला.[११] मराठयांनी गनिमी कावा पध्दतीने लढाई देऊन धनाजी जाधव आणि त्यांच्या सहकार्यांनी सर्जाखान या मोगलांच्या बलाढय सरदाराचा पराभव करुन त्याला साता-याच्या किल्ल्यात कैद केले.[१२] शिवाय मोगलांच्या चार हजार सैन्याचा पाडावा करुन खानास कैद करुन त्याच्याकडून एक लाख रुपये दंड घेऊन सोडून दिले.

राजपूत मुईनुद्दीनने १६९२ मध्ये पन्हाळा किल्ल्यास वेढा दिला.[१३] सन १६९४ पर्यंत तो किल्ल्यात ठाण मांडून होता. धनाजी जाधवांनी गनिमी काव्याने हा वेढा उध्वस्त करण्याचा बेत आखून भोईनुद्दीनच्या सैन्यावर अचानक हल्ला करुन त्याच्या सर्व तयारीचा विध्वंस घडवून आणला. यावरुन धनाजीने दाखविलेले असामान्य साहस, मुत्सद्दीपणा यांचा परिचय होतो.

**धनाजी जाधव कर्नाटकात** :- **सन १६९२**

मराठयांचा छत्रपती कर्नाटक प्रांतात असल्यामुळे मोगली फौजा जिंजी आणि कर्नाटक प्रांतात धुमाकूळ घालू लागल्या. परिणामतः जिंजीच्या वेढयावरुन मोगलांचे लक्ष हटविण्यासाठी धनाजी जाधव कर्नाटकात गेले. धनाजी जाधव, संताजी आणि शंकराजी नारायण यांनी १५००० घोडदळासह जिंजीकडे प्रयाण केले.[१४]. या मराठा सरदारांच्या आगमनामुळे कर्नाटकातील मराठा सैन्याला बळ आले. धनाजी आणि संताजी यांच्या हालचाली इतक्या गतिमान आणि विलक्षण होत्या की त्यांच्यासमोर मोगली सैन्य टिकाव धरु शकत नव्हते.

**धनाजीकडून इस्माईलखान कैद आणि मोगलांची जिंजीच्या वेढयातून माघार इ.स. १६९२** :-

धनाजी जाधवांच्या हाती असलेल्या तुकडीने जिंजी भोवतालच्या मोगली छावणीवर बाहेरुन हल्ले केले. मोगलांचा इस्माईलखान मखा नावाचा एक मोठा सरदार धनाजीच्या हाती लागला. त्याला कैद केले व त्याच्याकडील ५०० घोडे आणि दोन हत्ती जप्त केले.[१५]

**धनाजी जाधव मराठी राज्याच्या सेनापतिपदी** :-

जिंजीच्या दरबारात राजाराम महाराजांसोबत संताजी घोरपडेचे वितुष्ट आल्यामुळे संताजीला सेनापतिपदावरुन काढण्यात आले. मराठी राज्याचे सेनापतिपद धनाजी जाधवला मे १६९६ रोजी देण्यात आले. धनाजी जाधवांनी १६९७ ला छत्रपती राजराम यांची भेट घेऊन वाटेमध्ये ठिकठिकाणी मोगलांची ठाणी व सैन्य वावरत असतांना अत्यंत शिताफीने शत्रू पक्षाच्या हालचाली लक्षात घेऊन मराठयांच्या छत्रपतीला स्वराज्यात परत आणले.[१६]

जिंजीतून महाराष्ट्रात दाखल झाल्यांनतर राजाराम महाराजांनी सुरु केलेल्या व्यापक लष्करी हालचालींचा प्रकृतीवर वाईट परिणाम होऊन वयाच्या ३० व्या वर्षी २ मार्च १७०० रोजी सिंहगड येथे स्वर्गवासी झाला.[१७]

**सेनापती धनाजी जाधवांचे महाराणी ताराबाईच्या कारकीर्दीतील कार्य :- (सन १७००-१७०७).**

स्वराज्याचा खरा वारस शाहू हा मोगलांच्या कैदेत होता. धनाजी जाधव यांनी राजाराम नंतर महाराणी ताराबाई व छत्रपती राजाराम यांचे ज्येष्ठ चिरंजीव तिसरे शिवाजी यांस १० मार्च १७०० रोजी विधिवत सिंहासनावर बसविण्यात महत्त्वाची भूमिका बजावली.[१८]

**औरंगजेबाची मराठयांचे किल्ले जिंकण्याची मोहिम आणि धनाजीची भूमिका :-**

मराठयांच्या राजकीय अस्थितरेचा फायदा घेण्यासाठी औरंगजेबाने महाराष्ट्रभर फौजा पाठविल्या. मराठयांची शक्ती ही किल्ल्यांमध्ये आहे. त्यामुळे मराठयांचा एक एक किल्ला साम, दाम, दंड, भेद या मार्गाने मिळविण्याचा सपाटा सुरु केला. मराठयांनी औरंगजेबाला सहजासहजी किल्लेहाती लागू दिले नाहीत.

प्रस्तुत काळात मराठे आणि मोगल यांच्या पाठशिवणीचा खेळ चालूच होता. धनाजीच्या हालचालीमुळे मोगल सैन्य त्रस्त होते. धनाजी जाधवांनी कोणत्याही मोगल सरदारासोबत निर्णायक लढाई न करता त्यांना खेळत ठेवले. मराठयांचे हेच गनिमी काव्याचे तंत्र औरंगजेब बादशहा समजू शकत नव्हता.[१९] मोगलांची अधिकाधिक हानी होईर्पंत किल्ला लढवावा. किल्ल्यातील सर्व सामुग्री संपल्यावर त्याअभावी किल्ला लढविणे शक्य नाही. तेव्हा सुरक्षितता आणि विशिष्ट रक्कम देऊन त्या मोबदल्यात किल्ला मोगलांच्या स्वाधीन करावा हे धनाजीचे किल्ल्यासंबंधीचे धोरण असल्याचे दिसून येते. मराठे मोठमोठी शहरे लूटीत होते. नामांकित सेनानींना कैद करीत होते. अनेक ठिकाणाहून सक्तीची चौथाई वसूल करीत होते. धनाजींच्या मार्गदर्शनाखाली मराठयांनी पुर्वेला बंगाल, ओरिसापर्यंत लुटालूट केली.[२०] सेनापती धनाजी जाधव आणि मराठा राज्याला लष्करी मोहिमांनी जिंकणे अशक्य आहे हे आता औरंगजेब बादशहाला पुरेपूर कळून आले होते.

वयाच्या ८० व्या वर्षात असतांना दक्षिणेत २७ वर्षापेक्षा जास्त काळ युध्द संघर्ष करुनही दुरदूरपर्यंत मराठयांना नेस्तनाबूत करण्याचे बादशहाचे स्वप्न त्याच्याच डोळयांसमोर कापराप्रमाणे हळूहळू भंग पावतांना दिसत होते. अशाच विषष्ण अवस्थेत दिल्लीपती आलमगीर औरंगजेंब बादशहाचा दिनांक २० फेब्रुवारी १७०७ रोजी मृत्यू झाला.[२१] अशा प्रकारे अनेक वर्षापासून अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत मराठयांनी चालविलेला आपल्या स्वातंत्र्याचा लढा यशस्वीरीत्या पूर्ण झाला.

**शाहू माराजांची सुटका आणि खेडची लढाई** :-सन १७०७.

सेनापती धनाजी जाधव आणि छत्रपती शाहू महाराज यांचे संबंध पूर्वीपासूनच सलोख्याचे होते. छत्रपती शाहूला सोडविण्यासाठी धनाजी जाधवांनी भरपूर प्रयत्न केले होते. ३१ जानेवारी १७०७ मध्येही धनाजीने छत्रपती शाहूस सोडविण्याचे प्रयत्न केले होते.[२२] मराठयांमध्ये वारसा प्रश्न निर्माण करुन राजकीय अस्थिरता निर्माण करण्याचा कुटिल डाव मोगल बादशहने रचला. ८ मे १७०७ रोजी छत्रपती शाहू महाराजांना मुक्त करण्यात आले.[२३] परंतू शाहूच्या सुटकेनंतर महाराणी ताराबाईने शाहूचे स्वराज्यातील हक्क अमान्य करुन त्यास तोतया म्हणून घोषित केले.[२४]

शाहूचा स्वराज्यातील दावा नष्ट करण्यासाठी ताराबाईंनी सेनापती धनाजी जाधव, खंडेराव दाभाडे इत्यादि सरदारांना शाहूशी लढण्यासाठी पाठविले. १२ ऑक्टोंबर १७०७ रोजी खेड या ठिकाणी लढाईला सुरुवात झाली.[२५] परंतू धनाजी जाधव मात्र लढाई न करता शाहूस सामील झाला. परिणामी अचानक झालेल्या बदलामुळे शाहूचा विजय निश्चित झाला. खेड येथील धनाजीच्या निर्णयाने मराठयांच्या इतिहासात क्रांती झाली. मराठयांच्या सातारा आणि कोल्हापूर अशा दोन स्वतंत्र गादया निर्माण झाल्या.

**सेनापती धनाजी जाधवरावांचा मृत्यू (सन १७१०)** :-

जून १७०८ नंतर रांगण्याच्या मोहिमेवरुन परत येत असतांना पायाला व्रण होऊन (वृध्दापकाळामुळे) १७१० साली त्यांचा मृत्यू झाला.

मराठा स्वातंत्र्य संग्रामाच्या (इ.स. १६८९ ते १७०७) काळात सेनापती धनाजी जाधव यांनी केलेल्या पराक्रमास महाराष्ट्राच्या इतिहासामध्ये तोंड नाही. मराठा स्वातंत्र्यलढयात सेनापती संताजी घोरपडे, रामचंद्र पंत, धनाजी जाधव यांची भूमिका तत्कालीन इतिहासाला कलाटणी देणा-या ठरल्या. कोणत्याही प्रलोभनाची अपेक्षा न ठेवता धनाजींनी महाराणी ताराबाईंच्या कारकीर्दीत औरंगजेबाच्या मृत्यूपर्यंत स्वातंत्र्यलढा जोमाने चालवून मराठा राज्य अबाधित राखले. याचे श्रेय सेनापती धनाजी जाधव यांना जाते. म्हणून मराठी स्वातंत्र्यलढयात मराठयांच्या इतिहासाला कलाटणी देणारा सेनापती म्हणून धनाजी जाधव यांची नोंद घेणे आवश्यक ठरते.

संदर्भ ग्रंथ सुची :-

(१) गो.दा.दळवी, मराठा कुळांचा इतिहास भाग-१, जाधव घराण्याची कैफीयत, इंदुप्रकाश प्रेस मुंबई १९९२, पृ. ४२

(२) कित्ता पृ. क्रं. १३५

(३) गो.स. सरदेसाई, मराठी रियासत खंड ३, पॉप्युलर प्रकाश न मुंबई, पुर्नमुद्रण

२०१०,पृ.क्रं. ६३

(४) एस.ए. बाहेकर, सिंदखेडकर जाधव घराण्याचा चिकीत्सक इतिहास भाग-१, जळगाव कसब प्रकाशन २००१, पृ.क्र. १६५

(५) वा.सी.बेंद्रे, (संपा.) केशवपंडीतकृत राजाराम चरितम, भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे., १९३१ पृ. २९-३०.

(६) उत्तम हनवते., सेनापाती धनाजी जाधव., अभिजीत प्रकाशन लातूर., पृ.क्र. ३०

(७) जयसिंगराव पवार., सेनापती संताजी घोरपडे, मंजुश्री प्रकाशन कोल्हापूर १९८७ पृ.२२

(८) गो.स.सरदेसाई., शिघ्रकोपी संभाजी, स्थिरबृध्दी राजाराम., खंड-२, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई., पृ.क्रं. ३२-३९

(९) द.वी. आपटे, स.म.दिवेकर., शिवचरित्रप्रदिप., भारत इतिहास संशोधन मंडळ पुणे., १९२५ पृ. ३५

(१०) एस.ए. बाहेकर., सिंदखेडकर जाधव घराण्याचा चिकित्सक इतिहास, भाग-१, कसब प्रकाशन, पृ. क्रं. १५९

(११) सेनापती संताजी घोरपडे पृ.क्रं. ३१

(१२) कित्ता ३२.,

(१३) सिंदखेडकर जाधव घराण्याचा चिकीत्सक इतिहास भाग-१., पृ.क्रं. १६९

(१४) सेनापती धनाजी जाधव पृ.क्रं. ३८

(१५) शिवचरित्रप्रदीप पृ.क्रं. ३६

(१६) सेनापती धनाजी जाधव पृ. ४४

(१७) कित्ता पृ.क्रं. ४८

(१८) जयसिंगराव पवार मराठयांचे स्वातंत्र्ययुध्द., सुमेश प्रकाशन डोंबिवली, २००६, पृ.क्रं.८९

(१९) सिंदखेडकर जाधव घराण्याचा चिकित्सक इतिहास भाग-१., पृ.क्रं. १९०

(२०) मराठयांचे स्वातंत्र्ययुध्द पृ.क्रं. १९३

(२१) कित्ता

(२२) सेनापती धनाजी जाधव पृ.क्रं. ९८

(२३) कित्ता पृ.क्रं. ९६

(२४) कित्ता पृ.क्रं. ९८

(२५) मराठयांचे स्वातंत्र्ययुध्द पृ. क्रं. १९४

(२६) जाधव घराण्याची कैफियत पृ. क्रं. ६१२